ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

●वर्ष २४ वे ● अंक २३५ ● मंगळवार दि.१६ जून २०२६ ● नांदेड ● पोस्ट परवाना क्र.जी.-२/आरएनपी/एनएनडी-२६२/२०२३-२०२५ ● पाने ४ ● किंमत १ रु.

# पावसाचे ५ जुलैनंतरच पुनरागमन ?

## मराठवाडा,विदर्भात उष्णतेच्या लाटेचा इशारा



मुंबई/प्रतिनिधी-अरबी समुद्रातील मान्सूनचे ढग अचानक विरळ झाल्याने पावसाची प्रतीक्षा आणखी लांबण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. यापूर्वी १५ ते २० जूनदरम्यान मान्सून पुन्हा सक्रिय होईल, असे सांगण्यात आले होते. आता मात्र पावसाचे ५ जुलै नंतर पुनरागमन होईल असा अंदाज हवामान तज्ज्ञांकडून व्यक्त करण्यात येत आहे. त्याचसोबत मराठवाडा आणि विदर्भात पुढील ४८ तास उष्णतेची लाट राहिल, असा इशाराही देण्यात आला आहे.

राज्यातील शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांना दिलासा देणारा मान्सून सध्या कोकणातच थांबला आहे. हवामान विभागाकडून सुरुवातीला २० जूनपर्यंत पाऊस पडण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला होता. आता मात्र तो अल-निनोच्या परिणामामुळे पाऊस आणखी लांबणार असल्याचे सांगण्यात येत आहे. विदर्भ आणि मराठवाड्यात पुढील ४८ तास उष्णतेची लाट कायम राहण्याचा इशारा स्कायनेट या संस्थेकडून देण्यात आला आहे. मुंबईसह उपनगरांमध्ये वाढत्या उकाड्यामुळे नागरिक हैराण झाले असून, पावसाची कोणतीही ठोस शक्यता नसल्याचे चित्र आहे. पश्चिम महाराष्ट्र आणि कोकणात ढगाळ वातावरण असले, तरी पावसाने अचानक दडी मारली आहे. हवामानातील या बदलामागे एल निनोचा प्रभाव कारणीभूत असल्याचे सांगितले जात आहे. प्रशांत महासागरात एल निनो सक्रिय झाल्यामुळे त्याचा परिणाम देशातील मान्सूनच्या पुढील प्रवासावर स्पष्टपणे दिसून येत आहे. सध्या बंगालचा उपसागर आणि अरबी समुद्र दोन्ही तुलनेने शांत आहेत. उत्तर आंध्र प्रदेश आणि ओदिशा किनारपट्टीजवळ निर्माण झालेल्या सायक्लोनिक सर्क्युलेशनचा प्रभावही मर्यादित राहिला आहे. महाराष्ट्रात मान्सून रखडल्यामुळे बळीराजाची चिंता वाढली असून, पुढील काही दिवस राज्यातील बहुतांश भागात कोरडे हवामान राहण्याची शक्यता आहे. २० जूननंतर मान्सून हळूहळू पुन्हा पान ४ वर

# जात वैधता प्रमाणपत्रासाठी सहा महिन्यांची मुदतवाढ

## ग्रामीण पेयजल धोरणला मंत्रिमंडळाची मंजुरी

मुंबई/प्रतिनिधी-महापालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीत आरक्षित प्रवर्गातून निवडून आलेल्या उमेदवारांना जात प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्यांची मुद्दतवाढ देण्यासोबतच ग्रामीण भागात स्वच्छ पाणी पुरवठा करण्यासाठी ग्रामीण पेयजल, वैद्यकीय क्षेत्रातील आधुनिक सुविधांसह इतर काही महत्वाचे निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आले.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत स्थानिक स्वराज्य संस्थांमधील आरक्षित जागांवर निवडून आलेल्या नगरसेवक, जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्यांना मोठा दिलासा देणारे निर्णय घेण्यात आले. यासोबतच ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, वैद्यकीय क्षेत्रातील अत्याधुनिक सुविधा, कृत्रिम बुद्धिमत्ता व स्वयंचलित प्रणाली तसेच भारत नेट कार्यक्रमासंदर्भातील महत्त्वपूर्ण निर्णयांनाही मंजुरी देण्यात आली. आरक्षित प्रवर्गातून निवडून आलेल्या उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी आणखी सहा महिन्यांची अंतिम मुदतवाढ देण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला. यासाठी मुंबई महापालिका अधिनियम, महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम तसेच महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियमात आवश्यक सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याच्या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याच्या उद्देशाने पान ४ वर



शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी करण्यात यावी या मागणीसाठी तसेच शासनाने काढलेल्या फसव्या कर्जमाफी जीआरची शिवसेना (उबाठा) च्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर होळी करण्यात आली. या आंदोलनात शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भुजंग पाटील, बबन बारसे, ज्योतीबा खराटे, नरहरी वाघ, मनोज यादव, डॉ.बालाजी पेनुरकर, सुनील कदम, गजानन देशमुख, नवनाथ जोगदंड, जितुसिंघ टाक यांच्यासह इतर पदाधिकारी सहभागी झाले होते.

# मारहाण करुन लुटणाऱ्या तीन आरोपींना अटक



नांदेड/प्रतिनिधी-रस्त्यावर दुचाकी चालकांना अडवून मारहाण करीत लुटणाऱ्या तीन आरोपींना स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीसांनी अटक केली.

पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाचे पोलीस निरिक्षक अतुल भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरिक्षक रवी वाहुळे व पोलीस कर्मचारी हे सोमवारी शहरात गस्त घालीत असतांना चोरीचे मोबाईल विक्री करण्यासाठी काही जण ईदगाह रोडवरील वाजेगाव पुलाजवळ येणार असल्याची माहिती त्यांना मिळाली. सपोनी रवी वाहुळे व पोलीस कर्मचाऱ्यांनी सापळा रचून दुचाकीवर आलेल्या सय्यद आरफात सय्यद हुसेन (वय २६) रा. मलंगबाग बिल्डींग जवळ देगलूरनाका, नांदेड, मोहम्मद मतीन उर्फ तंडी मोहम्मद मुजफर (वय २८) रा.हबीबीया कॉलनी, देगलूरनाका,नांदेड, शेख अरबाज शेख अजीज (वय २१) रा.हतई, इतवारा, नांदेड या तीघांना अटक केली. त्यांच्या जवळून पोलीसांनी एक पान ४ वर

# कफ सिरप विक्रीवर केंद्राचे कठोर निर्बंध

नवी दिल्ली: डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय कफ सिरप सह विविध द्रवरुप औषधी थेट केमिस्टकडून खरेदी करता येणार नाहीत. औषध नियम १९४५ मध्ये करण्यात आलेल्या नव्या दुरुस्तीनुसार नोंदणीकृत वैद्यकीय तज्ज्ञांचे प्रिस्क्रिप्शन बंधनकारक करण्यात आले आहे.

मध्य प्रदेश आणि राजस्थानमध्ये दूषित कफ सिरपमुळे लहान मुलांचा मृत्यू झाल्याच्या घटनांनंतर द्रवरूप औषधांच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले होते. या पार्श्वभूमीवर उत्पादन, गुणवत्ता आणि विक्री प्रक्रियेवर अधिक कठोर नियंत्रण ठेवण्याची मागणी जोर धरत होती. त्यानंतर केंद्र सरकारने हा महत्वाचा निर्णय घेतला आहे.गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये जारी करण्यात आलेल्या प्रस्तावावर जनतेकडून प्राप्त झालेल्या सूचनांचा आणि आक्षेपांचा विचार करून ९ जून २०२६ रोजी यासंदर्भातील अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली. या दुरुस्तीनुसार औषध नियमावलीतील अनुसूची केमधून सिरप्स हा शब्द वगळण्यात आला आहे. त्यामुळे ही औषधे ओव्हर-द-काउंटर अर्थात डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय मिळणाऱ्या औषधांच्या श्रेणीतून बाहेर पडली आहेत.नव्या नियमांमुळे खोकल्यावरील सिरपसह इतर औषधी सिरप खरेदी करण्यासाठी ग्राहकांना आता डॉक्टरांचे अधिकृत प्रिस्क्रिप्शन सादर करणे आवश्यक राहणार आहे. यापूर्वी ही औषधे कोणत्याही प्रिस्क्रिप्शनशिवाय थेट फार्मसीमधून उपलब्ध होत होती.केंद्र सरकारच्या या निर्णयाचा परिणाम कफ सिरप आणि इतर द्रवरूप औषधांच्या नियमित खरेदीवर होण्याची शक्यता असून, औषधांच्या सुरक्षिततेसाठी आणि गैरवापर रोखण्यासाठी हा महत्वाचा टप्पा मानला जात आहे.

# तुकाराम मुंडे नांदेडात दाखल झाल्याची अफवा;कारवाईच्या धास्तीने पानटपऱ्या बंद

नांदेड/प्रतिनिधी-राज्यात भेसळखोरी, गुटखा व मुदतबाह्य औषध विक्री विरोधात कारवाईचे सत्र सुरु केले आहे. तुकाराम मुंडे हे मंगळवारी नांदेडात दाखल झाल्याच्या अफवेने शहरातील पानटपऱ्या काही मिनिटातच बंद झाल्या आहेत.

राज्य अन्न औषध प्रशासनाचे आयुक्त म्हणून तुकाराम मुंडे हे रुजू झाल्यानंतर त्यांनी राज्यात भेसळखोरी विरुद्ध धडाकेबाज कारवाई सुरु केली आहे. अनेक ठिकाणी धाडी टाकुन लाखो रुपयांचा साहित्य जप्त करण्यात आले. सोमवारी नांदेड शहरातील प्रसिद्ध तोष्णीवाल मेडीकल स्टोअर्सवर अन्न औषध प्रशासन विभागाने धाड टाकुन मुद्दत संपलेल्या गोळ्या जप्त केल्या आहेत. याप्रकरणी तोष्णीवाल मेडीकल स्टोअर्सच्या मालकाविरुद्ध कारवाई करण्यात आली. नांदेड शहरातील पानटपऱ्यांवर तंबाखुजन्य मट्रेल, गुटखा सर्रासपणे विक्री केला जात आहे. काही पानटपऱ्यांवर अन्न औषध प्रशासन विभागाने यापूर्वी कारवाई केली आहे. मंगळवारी सकाळी आयुक्त तुकाराम मुंडे हे नांदेड शहरात दाखल झाले असून पानटपऱ्यांवर कारवाई केली जाणार असल्याच्या अफवा कोणीतरी समाज माध्यमांवर केली. त्यानंतर काही मिनिटातच नांदेड शहरातील पानटपऱ्या बंद करण्यात आल्या आहेत. काही पानटपरी चालकांनी दुकानातील गुटखा व तंबाखुजन्य पदार्थ सुरक्षित ठिकाणी पाठवून पानटपऱ्यांना कुलूप लावले. तुकाराम मुंडे यांच्या धास्तीने आज शहरातील पानटपऱ्या बंद होत्या.




# सहलीला गेलेले नगरसेवक परतीच्या वाटेवर




नांदेड/प्रतिनिधी-नांदेड स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघासाठी दि.१८ जून रोजी मतदान होणार आहे. भाजपने सहलीला पाठविलेले जवळपास साडेतीनशे नगरसेवक परतीच्या वाटेवर असून बुधवारी जिल्ह्याच्या सिमेवर दाखल होणार आहेत.

नांदेड स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघात भाजप व महायुतीतर्फे अमरनाथ राजूरकर, महाविकास आघाडीकडून कृष्णा पाटील आष्टीकर व वंचित बहुजन आघाडीचे प्रशांत इंगोले हे निवडणूक लढवित आहेत. जिल्ह्यात ४५२ मतदारांची संख्या असून भाजपचे उमेदवार अमरनाथ राजूरकर यांनी जवळपास साडेतीनशे मतदारांना गोवा, केरळ व अन्य ठिकाणी सहलीला पाठविले आहे. महाविकास आघाडीचे उमेदवार कृष्णा पाटील आष्टीकर यांनीही काही नगरसेवकांना सहलीला पाठविले असून त्यांची संख्या खूप कमी आहे. निवडणुकीत कोणताही दगाफटका होवू नये याची काळजी भाजपच्या वरिष्ठ नेत्यांकडून घेतली जात आहे. भाजप व राष्ट्रवादी काँग्रेसच्या जवळपास सर्वच नगरसेवकांना आठ ते दहा दिवसांपूर्वी सहलीला पाठविण्यात आले. यामधील बहुतांश नगरसेवक गोवा येथे मुक्कामी होते. देगलूर येथील राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक गोवा येथील ब्रीचवर डान्स करतांना व्हिडीओ समाजमाध्यमावर व्हायरल झाला. त्यामुळे अनेक उलट-सुलट प्रतिक्रिया उमटल्या आहेत. भाजपच्याही नगरसेवकांना ठिकठिकाणी पर्यटनासाठी पाठविण्यात आले. नगरसेवकांचे आदरतिथ्य ठेवण्यासाठी काही निवडक पदाधिकाऱ्यांकडे विशेष जबाबदारी सोपविण्यात आली. माजी मुख्यमंत्री तथा खा.अशोक चव्हाण यांनी या निवडणुकीचे सुक्ष्मरित्या नियोजन पान ४ वर

# निंबाळकर हत्याकांडाचा निकाल आता २० जूनला

मुंबई/प्रतिनिधी-राज्यात गाजलेल्या पवनराजे निंबाळकर दुहेरी हत्याकांड प्रकरणाच्या निकालाची आज अपेक्षा असतानाच मुंबई सत्र न्यायालयाने निकालाचे वाचन करण्यासाठी अधिक वेळ लागणार असल्याने सुनावणी २० जूनपर्यंत तहकूब केली. त्यामुळे आता या बहुचर्चित खटल्याच्या निकालाकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

गेल्या दोन दशकांपासून राज्याच्या राजकीय वर्तुळात चर्चेत असलेल्या पवनराजे निंबाळकर दुहेरी खून खटल्याचा निकाल देण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाने आज सुनावणी घेतली. परंतु वेळेअभावी अचानक २० जून पर्यंत तहकूब केली. ३ जून २००६ रोजी मुंबईहून उस्मानाबादकडे जात असताना नवी मुंबईतील कळंबोली परिसरात पवनराजे निंबाळकर यांच्यावर दोन अज्ञात हल्लेखोरांनी गोळीबार केला होता. या हल्ल्यात त्यांचे चालक समद काझी यांचाही मृत्यू झाला होता. राजकीय वैमनस्यातून घडलेल्या या घटनेने राज्यभर खळबळ उडवून दिली होती.या प्रकरणात माजी गृहमंत्री डॉ. पद्मसिंह पाटील यांच्यासह एकूण नऊ आरोपींवर खटला सुरू आहे. मंगळवारी सकाळी मुंबई सत्र न्यायालयात सुनावणी पार पडली. यावेळी दिवंगत पवनराजे निंबाळकर यांचे पुत्र तथा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खासदार ओमराजे निंबाळकर, जयराजे निंबाळकर, आनंदीदेवी निंबाळकर तसेच दिवंगत समद काझी यांच्या कुटुंबीयांनी न्यायालयात उपस्थिती लावली. मुख्य आरोपी डॉ. पद्मसिंह पाटील हे प्रकृती अस्वास्थ्यामुळे रुग्णवाहिकेतून न्यायालय परिसरात दाखल झाले होते.

## एक स्वागतार्ह पाऊल

**युद्ध हा कोणत्याही समस्येचा कायमस्वरूपी उपाय नसतो. उलट युद्धामुळे मानवी जीवितहानी, आर्थिक नुकसान आणि जागतिक अस्थिरता निर्माण होते. गेल्या शंभरहून अधिक दिवसांपासून सुरू असलेल्या अमेरिकाइराण संघर्षाने याचीच प्रचिती जगाला दिली. अखेर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी युद्ध विरामाची घोषणा केल्याने जगभरात दिलासा व्यक्त केला जात आहे.१०७ दिवस चाललेल्या या संघर्षामुळे जागतिक अर्थ व्यवस्थेवर मोठा परिणाम झाला होता. त्यामुळे युद्ध विरामाची घोषणा हे निश्चितच एक स्वागतार्ह पाऊल मानावे लागेल.अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्षामुळे मध्यपूर्वेतील परिस्थिती अत्यंत तणावपूर्ण बनली होती. जगातील तेल उत्पादनाचा मोठा भाग या प्रदेशातून होत असल्याने या युद्धाचा थेट परिणाम पेट्रोलियम पदार्थांच्या पुरवठ्यावर झाला. अनेक देशांमध्ये इंधनाची टंचाई निर्माण झाली आणि पेट्रोल-डिझेलच्या किमती वाढल्या. परिणामी वाहतूक खर्च वाढून महागाईचा भडका उडाला. विकसनशील देशांसह विकसित अर्थ व्यवस्थांनाही या संकटाचा फटका बसला. जागतिक व्यापार, उद्योग आणि उत्पादन क्षेत्रांवर त्याचे दुष्परिणाम दिसून आले.यापूर्वीही युद्ध विरामाच्या घोषणा करण्यात आल्या होत्या. मात्र त्या केवळ तात्पुरत्या ठरल्या. एकीकडे शांततेची भाषा केली जात असताना दुसरीकडे एकमेकांवर हल्ले करून संघर्षाला पुन्हा चिथावणी देण्याचे प्रकार दोन्ही बाजूंनी घडत होते. त्यामुळे जागतिक समुदायामध्ये संशयाचे वातावरण होते. अशा परिस्थितीत १९ जून रोजी स्वित्झर्लंडमधील जिनिव्हा येथे शांतता करार होणार असल्याची घोषणा करण्यात आली आहे. विशेष म्हणजे इराणनेही या प्रक्रियेला सकारात्मक प्रतिसाद दिल्याने या वेळी शांततेच्या प्रयत्नांना अधिक विश्वासार्हता प्राप्त झाली आहे.जग सध्या अनेक संकटांचा सामना करत आहे. हवामान बदलामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे भारतासह अनेक देशांमध्ये कमी पावसाचे अंदाज वर्तविण्यात येत आहेत. कृषी क्षेत्रावर अवलंबून असलेल्या देशांसाठी ही चिंतेची बाब आहे. भारत हा कृषिप्रधान देश मानला जातो. देशाच्या अर्थ व्यवस्थेने अनेक संकटांच्या काळात कृषी क्षेत्राच्या बळावर उभारी घेतली आहे. अगदी कोविड-१९ महामारीच्या काळातही कृषी क्षेत्राने भारतीय अर्थ व्यवस्थेला स्थैर्य प्रदान केले होते. अशा वेळी वाढती महागाई, इंधन दरवाढ आणि जागतिक अस्थिरता यामुळे आर्थिक आव्हाने अधिक गंभीर बनत होती.अमेरिकाइराण संघर्षामुळे निर्माण झालेल्या इंधन संकटाचा परिणाम भारतावरही झाला. भारत आपल्या गरजेपैकी मोठ्या प्रमाणावर खनिज तेल आयात करतो. त्यामुळे जागतिक बाजारातील तेलाच्या किंमती वाढल्या की, त्याचा परिणाम देशांतर्गत महागाईवर होतो. शेती, उद्योग, वाहतूक आणि सर्वसामान्य नागरिकांचे जीवन यावर त्याचा विपरीत परिणाम होतो. त्यामुळे या युद्ध विरामाकडे केवळ राजकीय नव्हे तर आर्थिक दृष्टिकोनातूनही पाहणे आवश्यक आहे.युद्ध विरामाच्या घोषणेनंतर जागतिक बाजारपेठांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. कच्च्या तेलाच्या किंमतीत घसरण होण्यास सुरुवात झाली असून शेअर बाजारातही उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. गुंतवणूकदारांचा आत्मविश्वास वाढू लागला आहे. जागतिक अर्थ व्यवस्थेला स्थैर्य मिळण्याच्या आशा निर्माण झाल्या आहेत. संकटाच्या काळात अशा सकारात्मक घडामोडी समाजाला आणि अर्थ व्यवस्थेला नवचैतन्य देणाऱ्या ठरतात.तथापि, केवळ युद्ध विरामाची घोषणा पुरेशी नाही. जिनिव्हा येथे होणाऱ्या चर्चेतून ठोस आणि दीर्घकालीन शांतता करार होणे अत्यंत आवश्यक आहे. संघर्षाची मूळ कारणे दूर करून परस्पर विश्वास वाढविण्याचे प्रयत्न झाले तरच या प्रदेशात स्थैर्य निर्माण होऊ शकेल. अन्यथा तात्पुरत्या शांततेनंतर पुन्हा संघर्ष भडकण्याची शक्यता नाकारता येणार नाही. एकूणच, अमेरिकाइराण युद्ध विरामाची घोषणा ही जगासाठी आशेचा किरण ठरली आहे. युद्धाऐवजी संवाद आणि सहकार्याचा मार्ग स्वीकारणे ही काळाची गरज आहे. १९ जून रोजी होणाऱ्या चर्चेकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे. या चर्चेतून स्थायी शांततेचा मार्ग मोकळा होऊन जागतिक अर्थ व्यवस्थेला नवसंजीवनी मिळावी, हीच सर्वांची अपेक्षा आहे.**

# समाज उन्नतीकडे जाण्यापेक्षा उन्मत्ततेकडे चालला आहे का?




समाजाची प्रगती ही केवळ आर्थिक विकासाने मोजली जात नाही, तर त्याच्या विचारांनी, मूल्यांनी, संस्कृतीने, परस्परांतील विश्वासाने आणि सामाजिक सुरक्षिततेने मोजली जाते. परंतु आजचे चित्र पाहिले, तर मनात एक प्रश्न वारंवार निर्माण होतो की, आपण खरोखर उन्नतीच्या दिशेने चाललो आहोत की उन्मत्ततेच्या आणि अधोगतीच्या मार्गावर निघालो आहोत? रोज घडणाऱ्या घटना, वाढत चाललेले वाद, भांडणे, खून, आत्महत्या, फसवणूक, भ्रष्टाचार आणि नैतिक मूल्यांची घसरण पाहिली की मन अस्वस्थ होते. समाजात समाधान, संयम, सहकार्य आणि बंधुभाव यांची जागा अहंकार, स्वार्थ, मत्सर आणि द्वेषाने घेतल्याचे दिसून येते. या परिस्थितीचा गांभीर्याने विचार करून त्यामागील कारणांचा शोध घेणे आणि त्यावर प्रभावी उपाययोजना करणे ही काळाची गरज आहे.

आज घराघरात, कुटुंबामध्ये, गावोगावी, गल्लीबोळात वाद-विवाद सुरू आहेत. प्रत्येक जण दुसऱ्याला दोष देण्यात व्यस्त आहे. संवाद कमी झाला असून संघर्ष वाढला आहे. पूर्वी एखाद्या गावात भांडण झाले, तर संपूर्ण गावातील ज्येष्ठ मंडळी एकत्र येऊन तो प्रश्न सोडवत असत. आज मात्र परिस्थिती उलट झाली आहे. वाद मिटविण्याऐवजी त्यामध्ये आणखी ठिणगी टाकण्याचे काम अनेक ठिकाणी होताना दिसते. हे अत्यंत दुर्दैवी आहे.समाजातील भयाचे वातावरण दिवसेंदिवस वाढत आहे. साध्या रस्त्याने चालतानाही सुरक्षित वाटत नाही. एखाद्या किरकोळ कारणावरून जीवघेणे हल्ले होतात. पूर्वी वर्षातून एखाद्या खुनाची बातमी ऐकायला मिळत असे, परंतु आज जवळजवळ दररोज अशा घटना समोर येत आहेत. माणसाच्या जीवाचे मूल्य इतके कमी झाले आहे का, असा प्रश्न पडतो.या परिस्थितीसाठी केवळ समाजच नव्हे तर प्रशासन आणि राजकीय व्यवस्था देखील काही प्रमाणात जबाबदार आहे. गृहखात्याचा धाक कमी झाला आहे का? पोलिसांची संख्या अपुरी आहे का? कायद्याची अंमलबजावणी प्रभावीपणे होत नाही का? या प्रश्नांचा गंभीरपणे विचार होणे आवश्यक आहे. प्रत्येक चौकात पोलीस चौकी असणे शक्य नसले, तरी नागरिकांमध्ये कायद्याबद्दल आदर आणि गुन्हेगारांमध्ये भीती निर्माण होणे आवश्यक आहे. कमीत कमी समाजात शिस्त राखणारी व्यवस्था मजबूत असली पाहिजे.

आज राजकारण समाजहितासाठी कमी आणि सत्तेसाठी जास्त केले जात आहे. स्थानिक नेते अनेकदा समाजातील प्रश्न सोडविण्याऐवजी त्यांचा राजकीय फायदा कसा करून घेता येईल, याचाच विचार करतात. समाजात ऐक्य निर्माण करण्याऐवजी विभागणी करण्याचे प्रकार वाढत आहेत. यामुळे सामान्य नागरिकांचा विश्वास कमी होत चालला आहे.पूर्वी समाजात ज्येष्ठ व्यक्तींना मान होता. त्यांचा शब्द अंतिम मानला जायचा. त्यांनी दिलेला सल्ला लोक ऐकत असत. आज ती पिढी हळूहळू निघून गेली आहे. त्यांच्या जागी अनुभवापेक्षा अहंकार अधिक असलेली पिढी तयार होत आहे. प्रत्येकाला दुसऱ्याच्या उणिवा माहीत आहेत, परंतु स्वतःच्या दोषांकडे पाहण्याची तयारी नाही. परिणामी समाजात कटुता वाढत आहे.आजचा मित्र उद्या शत्रू होतो. नाती क्षणात बदलतात. विश्वासाचा पाया ढासळत चालला आहे. आपले कोण आणि परके कोण, हेच कळेनासे झाले आहे. समाजातील माणुसकी हरवत चालल्याची ही गंभीर चिन्हे आहेत.निसर्ग देखील मानवाच्या चुकीच्या वर्तनामुळे संतुलन बिघडवत आहे. कुठे दुष्काळ, तर कुठे अतिवृष्टी. कुठे पाणी नाही, तर कुठे पूर. शेतकरी संकटात सापडला आहे. पेरणीचे प्रश्न, उत्पादनाचा खर्च, बाजारातील अनिश्चितता या सगळ्यांमुळे तो हतबल झाला आहे. अनेक वेळा आत्महत्येचा मार्ग स्वीकारण्याची वेळ त्याच्यावर येते. परंतु कोणतेही संकट आले तरी जीवन संपविणे हा उपाय असू शकत नाही. कारण गेलेला जीव पुन्हा परत येत नाही. त्यामुळे प्रत्येकाने जीवनाबद्दल सकारात्मक दृष्टिकोन ठेवणे आवश्यक आहे.

स्वतः सुरक्षित राहा आणि दुसऱ्यालाही सुरक्षित ठेवा, हा विचार प्रत्येकाच्या मनात रुजायला हवा. समाजातील प्रश्न सोडवण्यासाठी सरकार, प्रशासन आणि नागरिक या तिन्ही घटकांनी एकत्रितपणे प्रयत्न करण्याची गरज आहे.शिक्षण क्षेत्रातही अनेक गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. पैशाच्या जोरावर गुणवत्ता आणि पात्रतेला मागे टाकले जात आहे. डॉक्टरांचा मुलगा डॉक्टर आणि अभियंत्याचा मुलगा अभियंता होणे चुकीचे नाही; परंतु पात्रता आणि गुणवत्तेला दुय्यम स्थान देऊन केवळ पैशाच्या जोरावर व्यावसायिक शिक्षण मिळत असेल, तर त्याचे गंभीर परिणाम समाजाला भोगावे लागतील.आज वैद्यकीय क्षेत्रात प्रचंड व्यावसायिकता आली आहे. पूर्वी मोजक्या शुल्कात उपचार करणारे डॉक्टर होते. रुग्णांच्या परिस्थितीचा विचार केला जात असे. आज लाखो रुपयांच्या उपचारांचा खर्च सामान्य माणसाच्या आवाक्याबाहेर गेला आहे. महागडी इंजेक्शने, महागडी औषधे आणि वाढते हॉस्पिटलचे बिल यामुळे गरीब माणूस अक्षरशः उद्ध्वस्त होत आहे.डुप्लिकेट औषधे, अनावश्यक चाचण्या आणि व्यापारीकरणामुळे आरोग्यसेवेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. गरीब अधिक गरीब होत चालला आहे, तर श्रीमंत अधिक श्रीमंत होत आहे. ही वाढती आर्थिक दरी समाजासाठी धोकादायक ठरू शकते.



दत्तोपंत डहाळे
नांदेड.

लोकांना विविध योजनांच्या माध्यमातून मोफत सुविधा दिल्या जातात. समाजकल्याणासाठी योजना आवश्यक असल्या, तरी त्या मतांसाठी वापरणे योग्य नाही. लोकशाहीमध्ये मतदारांना प्रलोभने देण्यापेक्षा स्वावलंबी बनविणे अधिक महत्त्वाचे आहे.देश आणि राज्यावर वाढणारे कर्ज ही देखील चिंतेची बाब आहे. विकासासाठी कर्ज घेणे चुकीचे नाही, परंतु त्याचा योग्य उपयोग होणे आवश्यक आहे. जनतेच्या पैशांचा अपव्यय होऊ नये, ही जबाबदारी राज्यकर्त्यांची आहे. शासकीय खर्चात काटकसर आणि पारदर्शकता आवश्यक आहे.भ्रष्टाचार आणि फसवणुकीचे प्रकार वाढत आहेत. सामान्य नागरिकाच्या आयुष्यभराच्या बचतीवर डल्ला मारला जात आहे. जमीन व्यवहार, प्लॉट विक्री, आर्थिक घोटाळे आणि विविध प्रकारच्या फसवणुकीमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. अशा वेळी प्रशासनाने नागरिकांच्या संरक्षणासाठी अधिक प्रभावी भूमिका बजावली पाहिजे.महागाईमुळे सामान्य माणसाचे जीवन कठीण झाले आहे. पेट्रोल, डिझेल, वीज, गॅस आणि दैनंदिन गरजेच्या वस्तूंच्या वाढत्या किमतींमुळे कुटुंबाचे अर्थकारण कोलमडले आहे. दुसरीकडे वीज चोरी, पाणी चोरी आणि भ्रष्ट व्यवस्थेमुळे प्रामाणिक नागरिकांवर अतिरिक्त भार पडत आहे.


समाजात दिखाऊपणाची प्रवृत्ती वाढत चालली आहे. उधळपट्टी, महागड्या पार्ट्या, आलिशान जीवनशैली आणि दिखाऊ खर्च यामुळे मूल्यांची घसरण होत आहे. एका बाजूला लाखो रुपयांचे बिल भरले जाते, तर दुसऱ्या बाजूला गरीब कुटुंब दोन वेळच्या जेवणासाठी संघर्ष करत असते. ही विषमता मनाला वेदना देणारी आहे.आज अनेक धार्मिक प्रवचनकार, कीर्तनकार आणि समाजप्रबोधन करणाऱ्या व्यक्तींनाही विविध संकटांना सामोरे जावे लागत आहे. जीवन हे नशिबाचा आणि कर्माचा खेळ आहे. त्यामुळे कोणाच्याही यशाने गर्विष्ठ होऊ नये आणि अपयशाने खचून जाऊ नये.न्यायव्यवस्थेतील विलंब हा देखील चिंतेचा विषय आहे. एखाद्या प्रकरणाचा निकाल लागण्यासाठी अनेक वर्षे लागतात. गरीब माणूस वकील, कोर्ट आणि तारखांच्या चक्रात अडकून जातो. न्याय मिळण्याआधीच अनेकदा त्याचे आर्थिक आणि मानसिक नुकसान होते. त्यामुळे न्यायव्यवस्था अधिक वेगवान आणि सर्वसामान्यांना परवडणारी होणे आवश्यक आहे.आज व्यसनाधीनता हा समाजासमोरील मोठा प्रश्न आहे. दारू, तंबाखू, अमली पदार्थ आणि इतर व्यसनांमुळे अनेक कुटुंबे उद्ध्वस्त होत आहेत. पालकांच्या चुकीच्या सवयींचे अनुकरण मुले करतात. त्यामुळे कुटुंबातील मोठ्या व्यक्तींनी आदर्श निर्माण करणे आवश्यक आहे.

स्त्रियांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही अत्यंत महत्त्वाचा आहे. शिक्षण, नोकरी आणि व्यवसायासाठी घराबाहेर पडणाऱ्या महिलांना सुरक्षित वातावरण मिळणे आवश्यक आहे. समाजातील प्रत्येक व्यक्तीने महिलांचा सन्मान राखणे ही आपली जबाबदारी समजली पाहिजे.पाणीटंचाई, वीज समस्या आणि मूलभूत सुविधांचा अभाव या समस्या आजही अनेक ठिकाणी कायम आहेत. लोकांना रात्री उशिरापर्यंत पाण्यासाठी जागावे लागते. अशा मूलभूत गरजा पूर्ण झाल्याशिवाय विकासाची स्वप्ने अपुरीच राहतील.आपण २०४७ च्या विकसित भारताचे स्वप्न पाहत आहोत. हे स्वप्न नक्कीच महत्त्वाचे आहे. परंतु त्यासाठी आजच्या समस्या सोडविणे अधिक गरजेचे आहे. विकास केवळ मोठ्या घोषणांनी होत नाही, तर सामान्य नागरिकाच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणल्याने होतो.समाजात विश्वास, प्रामाणिकपणा आणि माणुसकी टिकून राहिली पाहिजे. समोर स्तुती आणि पाठीमागे निंदा करणे हा स्वभाव सोडला पाहिजे. एकमेकांबद्दल आदर आणि सहकार्याची भावना वाढली पाहिजे.प्रत्येकाने स्वतःच्या अंतर्मनात डोकावून पाहण्याची गरज आहे. आपण किती चांगले आहोत, यापेक्षा आपण कुठे चुकतो आहोत, याचा विचार करणे आवश्यक आहे. समाज बदलायचा असेल, तर सुरुवात स्वतःपासून करावी लागेल.

आजच्या परिस्थितीबद्दल टीका करणे सोपे आहे; परंतु सकारात्मक बदल घडविण्यासाठी कृती करणे अधिक महत्त्वाचे आहे. अंधाराला दोष देण्यापेक्षा एक दिवा लावणे अधिक आवश्यक आहे. समाज उन्मत्त होण्यापेक्षा उन्नतीच्या मार्गावर जावा, यासाठी प्रत्येक नागरिकाने जबाबदारी स्वीकारली पाहिजे.प्रकाश, प्रामाणिकपणा, संयम, सहिष्णुता, माणुसकी आणि राष्ट्रप्रेम या मूल्यांच्या आधारावरच समाजाचे भविष्य उज्ज्वल होऊ शकते. अन्यथा भौतिक प्रगती झाली, तरी नैतिक अधःपतनामुळे समाजाचा पाया कमकुवत होईल.म्हणूनच आज गरज आहे ती आत्मपरीक्षणाची, मूल्यांच्या पुनर्स्थापनेची आणि सामाजिक एकात्मतेची. आपण स्वतः बदललो, तर कुटुंब बदलेल; कुटुंब बदलले, तर समाज बदलेल; आणि समाज बदलला, तर राष्ट्र निश्चितच प्रगतीच्या दिशेने वाटचाल करेल.उन्मत्ततेचा अंधार दूर करून उन्नतीचा प्रकाश निर्माण करणे हीच आजची खरी गरज आहे. माणूस जगला पाहिजे, विश्वासाने जगला पाहिजे, आणि समाजाने माणसाला जगण्याचा आधार दिला पाहिजे. हीच खरी प्रगती आणि हीच खरी सभ्यता आहे.

## 'ये रे घना...ये रे घना...न्हाऊ घाल माझ्या मना...' ;आता साऱ्यांनाच लागली...पावसाच्या थेंबाची प्रतीक्षा...

# शेतकऱ्यांच्या नजरा आकाशाकडे,मृग नक्षत्रात कडक ऊन



बी.आर.पांचाळ
भोकर
वार्तापत्र

भोकर-तीन महिन्याच्या कडक उन्हाच्या तीव्रतेने मानवी जीवन व्याकुळ झाले होते, मे महिन्यामध्ये तर सूर्य आग ओकू लागला सकाळी ९ वाजल्यापासूनच उन्हाचे चटके लागत होते प्रचंड उकाडा आणि वाफेसारखे ऊन यामुळे जीवाची लाही लाही होत होती.. कधी एकदाचा जून महिना येतो आणि थंड वारे वाहू लागतात... आकाशात काळे काळे ढग दिसू लागतात..कधी पावसाच्या सरी बरसतात असे साऱ्यांनाच वाटू लागले मात्र मृग नक्षत्रात देखील कडक ऊन लागत असल्याने आता साऱ्यांनाच पावसाच्या थेंबाची प्रतीक्षा लागली आहे... बळीराजाचे डोळे आकाशाकडे लागलेले आहेत. एका सुंदर कवितेच्या ओळी प्रमाणे येरे घना...येरे घना...न्हाऊ घाल माझ्या मना अशीच सुंदर आठवण पावसाच्या संदर्भात होऊ लागली आहे.

मागील वर्षाच्या खरीप हंगामात भोकर तालुक्यात अतिवृष्टीने पाऊस झाला नद्या नाल्यांना पूर आले खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले मागील वर्षी मे महिन्यातच पावसाने सुरुवात केली होती. रोहिणी नक्षत्रामध्ये सुद्धा पाऊस झाला होता. चालू वर्षी रोहिणी नक्षत्र कोरडे गेले मृग नक्षत्र लागून सुद्धा आठ दिवस होऊन गेले आहेत उन्हाळ्यासारखे ऊन लागत आहे.आता साऱ्यांना पावसाच्या थेंबाची प्रतीक्षा लागली असून कधी एकदाचा पाऊस पडतो आणि साऱ्या वातावरणात थंडगार गारवा निर्माण होतो असेच वाटू लागले आहे. आता प्रतीक्षा लागली पावसाच्या थेंबाची दरवर्षी मे महिन्यामध्ये अवकाळी पावसाने सुरुवात होते गेली दोन वर्षे मे महिन्यातच मुबलक प्रमाणात पाऊस झाला होता. नद्या नाल्या देखील भरल्या होत्या, मात्र चालू वर्षी कडक उन्हाळाच राहिला तीन महिने उन्हाळ्याचे उकाड्याच्या त्रासामध्ये काढावे लागले चालू वर्ष एवढा उन्हाळा मागील पन्नास वर्षातही बघितला नाही, असे अनेक जाणकारांनी सांगितले. उन्हाचे चटके सोसल्या नंतर जून महिन्यामध्ये तरी पाऊस सुरू होईल धरणी माता पावसाच्या थेंबाने शांत होऊन वातावरणात गारवा निर्माण होईल अशी अपेक्षा सर्वांना होती. मात्र १५ जून पर्यंत पाऊसच झाला नाही मृग नक्षत्र कोरडे जाते की काय अशी भीती सर्वांना वाटू लागली आहे. एकदाचा पाऊस पडावा थंडगार गारवा सुटावा पावसाचे टपोरे थेंब बरसावेत अशीच आशा सगळ्यांना लागली आहे.

**बळीराजा सज्ज मात्र मृग नक्षत्रात उन्हाचा तडाका**

प्रत्येक वर्षीच आर्थिक अडचणीत सापडलेल्या बळीराजाला मागील संकटाचा सामना करीत पुढे येणाऱ्या पेरणीसाठी सज्ज राहावे लागते निसर्गाचे अवकृपा दरवर्षीच होत असल्याने बळीराजा कर्जबाजारी झाला आहे. मात्र साऱ्या अडचणी मागे सारून पुन्हा बळीराजा नवीन स्वप्न घेऊन पेरणीसाठी सज्ज झाला आहे. रासायनिक खते व बियाणांचे भाव गगनाला भिडलेले असताना देखील शेतकरी काळ्यामाईची मशागत करून पेरणीसाठी सज्ज झालेला आहे. मात्र मृग नक्षत्र निघून सुद्धा आठ दिवस निघून गेल्याने शेतकऱ्यांना आता चिंता लागली आहे शेतकऱ्यांचे डोळे आकाशाकडे लागले आहेत. कधी एकदाचा पाऊस पडतो आणि शेतामध्ये बीज रोवल्या जाते अशीच अशा शेतकरी करीत आहेत. सरांनाच पावसाची मात्र प्रतीक्षा लागली आहे उन्हाळ्याप्रमाणे ऊन लागत असल्याने सुद्धा चिंता निर्माण झाली आहे जोराचा पाऊस बरसावा धरनी माता न्हावून निघावी शेतामध्ये पेरणी व्हावी अशीच आशा सर्वांना लागली आहे.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# नांदेड विधान परिषदेसाठी दि.१८ रोजी मतदान

## ४५२ मतदार बजावणार मतदानाचा हक्क

नांदेड/प्रतिनिधी-महाराष्ट्र विधान परिषद नांदेड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ निवडणुकीसाठी तीन उमेदवार निवडणूक रिंगणात असून मतदानासाठी नांदेड जिल्ह्यातील महसूल उपविभागांच्या ठिकाणी एकूण आठ मतदान केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत.

मतदान गुरूवार १८ जून २०२६ रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ यावेळेत होणार आहे. मतदानासाठी येताना मतदारांनी स्थानिक प्राधिकरणाकडून देण्यात आलेले ओळखपत्र अथवा भारत निवडणूक आयोगाने मान्यता दिलेल्या पुराव्यांपैकी एक पुरावा सोबत आणणे आवश्यक आहे.

सदर निवडणुकीमध्ये एकूण ४५२ मतदार मतदानाचा हक्क बजावणार असून त्यापैकी २२४ स्त्री मतदार तर २२८ पुरुष मतदार आहेत. या मतदारांमध्ये जिल्ह्यातील महानगरपालिकेचे सर्व सदस्य तसेच नांदेड जिल्ह्यातील सर्व नगरपरिषद व नगरपंचायतांचे अध्यक्ष आणि सदस्य यांचा समावेश आहे. मतदान केंद्राचे ठिकाण व मतदान केंद्रात जोडण्यात आलेल्या स्थानिक प्राधिकरणाचे नाव आणि मतदारांची संख्या पुढीलप्रमाणे आहे. तहसील कार्यालय किनवट येथील मतदान केंद्रात किनवट नगरपरिषद २४, नगरपंचायत माहूर १७ असे एकूण ४१ मतदार मतदानाचा हक्क बजावतील याप्रमाणे तहसील कार्यालय हदगाव या मतदान केंद्रावर नगरपरिषद हदगाव २३, नगरपंचायत हिमायतनगर १९ एकूण ४२, तहसील कार्यालय भोकर येथील मतदान केंद्रात नगरपरिषद भोकर २५, नगरपरिषद मुदखेड २३ एकूण ४८ मतदार, तहसील कार्यालय नांदेड येथील मतदान केंद्रात अर्धापूर नगरपंचायत १९, नांदेड वाघाळा महानगरपालिका नांदेड ८९ असे एकूण १०८ मतदार मतदानाचा हक्क बजावतील. तहसील कार्यालय कंधार येथील मतदान केंद्रात नगरपरिषद कंधार २३, नगरपरिषद लोहा २३ असे एकूण ४६ मतदार तर तहसील कार्यालय धर्माबाद येथील मतदान केंद्रात नगरपरिषद धर्माबाद २५, नगरपरिषद उमरी २३ एकूण ४८ तर तहसील कार्यालय बिलोली येथील मतदान केंद्रात नगरपंचायत नायगाव १९, नगरपरिषद बिलोली २३, नगरपरिषद कुंडलवाडी २३ असे एकूण ६५ तर तहसील कार्यालय देगलूर येथील मतदान केंद्रात नगरपरिषद देगलूर ३१, नगरपरिषद मुखेड २३ असे एकूण ५४ मतदार आहेत. याप्रमाणे नांदेड जिल्ह्यातील एकुण ४५२ मतदार आपल्या मतदानाचा हक्क बजावतील. त्यानंतर सोमवार दि.२२ जून रोजी सकाळी ८ वाजता या निवडणुकीची मतमोजणी कॅबिनेट हॉल नियोजन भवन तळमजला जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड येथे होणार आहे.

# देगलूर उपजिल्हा रुग्णालयात ठाकरे सेनेचे आंदोलन

देगलूर/प्रतिनिधी-देगलूर येथील उपजिल्हा रुग्णालयात नियुक्त असलेले सर्व वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी रुग्णालयात नियमितपणे उपस्थित राहून नागरिकांना सेवा द्यावी. शंभर खाटांचे उपजिल्हा रुग्णालय पूर्ण क्षमतेने कार्यान्वीत करावे व इतर मागण्यांसाठी शिवसेना (उबाठा) पक्षाच्यावतीने रुग्णालयाच्या आवारात गोंधळ आंदोलन करण्यात आले.

शिवसेना उपजिल्हाप्रमुख महेश पाटील यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. आंदोलना दरम्यान जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. पेरके आणि वैद्यकीय अधीक्षक डॉ. देवणीकर यांनी मागण्यांबाबत लेखी आश्वासन दिल्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले. यावेळी पांडुरंग पाटील थडके देगावकर, नागनाथ वाडेकर, भगवान जाधव, भागवत पाटील सोमुरकर, बाबुराव मिनकीकर, राहुल सोनकांबळे, संतोष कांबळे, विनोद सोनकांबळे, सय्यद मीर, इस्माईलखान पठाण, मानाजी पाटील लोणे लोणीकर, व्यंकट रेड्डी आलुरे शहापूरकर, गंगाधर पाटील चाकूरकर, राजेंद्र उल्लेवार मुजळगेकर, हाणमंत पाटील शिवणीकर, हाणमंत राजुरे लखखेकर, किशन पाटील शहापूरकर, तुकाराम निवळे काठेवाडीकर, नागनाथ विभुते चैनपूरकर, परमेश्वर कोकणे, शिवाजी सोनकांबळे मुजळगेकर यांच्यासह अनेक पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते. दरम्यान, आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# संभाव्य दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर चारा उत्पादनासाठी आढावा बैठक संपन्न



नांदेड/प्रतिनिधी-संभाव्य दुष्काळी परिस्थितीमुळे निर्माण होणारी चारा टंचाई लक्षात घेऊन चारा उत्पादन वाढीसाठी करावयाच्या उपाययोजनांबाबत जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांच्या अध्यक्षतेखाली संयुक्त आढावा बैठक काल १५ जून रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीस नांदेड पाटबंधारे मंडळ, दक्षिण नांदेड पाटबंधारे मंडळ, अप्पर पैनगंगा प्रकल्प, इसापूर, लघुसिंचन विभाग, जिल्हा परिषद तसेच पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी उपस्थित होते. बैठकीत संभाव्य दुष्काळी परिस्थितीत जनावरांसाठी पुरेशा चाऱ्याची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी विविध विभागांनी समन्वयाने काम करण्यावर भर देण्यात आला.तसेच, उपलब्ध जलस्रोतांचा नियोजनबद्ध वापर करून चारा पिकांचे उत्पादन वाढविणे, आवश्यक नियोजन करणे आणि संबंधित विभागांनी परस्पर सहकार्याने तातडीच्या उपाययोजना राबविण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या. आगामी काळात जिल्ह्यात चारा टंचाई निर्माण होऊ नये यासाठी सर्व विभागांनी एकत्रित प्रयत्न करून प्रभावी कृती आराखडा तयार करण्याचे निर्देश यावेळी देण्यात आले.




नीट पेपरफुटीच्या निषेधार्थ युवक काँग्रेसच्यावतीने सोमवारी रात्री मशाल रॅली काढण्यात आली होती. या रॅलीत खा.रविंद्र चव्हाण, युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शिवराज मोरे, माजी आ.माधवराव पाटील जवळगावकर, सुरेशदादा गायकवाड, जिल्हाध्यक्ष शंकर शिंदे, डॉ.विठ्ठल पावडे, प्रा.यशपाल भिंगे, अब्दुल गफार, नगरसेवक मुन्ना अब्बास हुसेन, एकनाथ मोरे, सुरेंद्र घोडजकर, श्रावण रॅपनवाड, सत्यपाल सावंत यांच्यासह पदाधिकारी सहभागी झाले होते.

# भोशी ग्रामपंचायत प्रभाग आरक्षणात ओबीसीला केवळ १ जागा राखीव;मुख्यमंत्र्याकडे केली तक्रार

## चुकीच्या पद्धतीने आरक्षण काढल्याचा आरोप

भोकर/प्रतिनिधी-तालुक्यातील अनेक ग्रामपंचायतीमध्ये प्रभाग आरक्षणात ओबीसींना जागाच नाहीत भोशी येथील ग्रामपंचायत आरक्षणात यापूर्वी ओबीसीला ४ जागा असताना आता केवळ १ जागा निघाल्याने आरक्षणाबाबत मुख्यमंत्र्याकडे तक्रार करण्यात आली आहे.

भोकर तालुक्यातील ६३ ग्रामपंचायतीच्या प्रभाग आरक्षणाचा कार्यक्रम जाहीर झाला यामध्ये ओबीसीसाठी आरक्षणाच्या अत्यल्प जागा ठेवण्यात आल्या भोसी ग्रामपंचायतच्या आरक्षणा-बाबत संतोष गंगाधर आकेमवाड यांनी मुख्यमंत्र्याकडे तक्रार केली असून ग्रामपंचायत मध्ये पूर्वी ओबीसीला ४ जागा असताना आताच्या आरक्षणामध्ये केवळ १ जागा निघाली २० ते २५ वर्षापासून ओबीसीला ४ जागा आहेत ११ सदस्य संख्या असताना ८० टक्के ओबीसी समाज असताना १ जागा मिळणे हे चुकीचे आहे चुकीच्या नियमामुळे अन्याय होत असून लोकशाहीच्या नियमांचे उल्लंघन होत आहे आक्षेपाचा सहानुभूतीपूर्वक विचार करून आरक्षण सोडतीची पुनरतपासणी करून नियमानुसार योग्य तो बदल करून द्यावा असे निवेदनात नमूद करण्यात आले असून जिल्हाधिकारी तहसीलदार यांना निवेदनाच्या प्रती देण्यात आल्या आहेत

# आयुक्तांच्या दालनात दिव्यांगांचे ठिय्या आंदोलन

नांदेड/प्रतिनिधी-महापालिका हद्दीतील दिव्यांग लाभार्थ्यांच्या प्रलंबित ५ टक्के राखीव निधीसह विविध मागण्यांसाठी सकल दिव्यांग संघटनेने आयुक्तांच्या दालनासमोर सोमवारी ठिय्या आंदोलन करुन प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. महापालिका हद्दीत १५१ दिव्यांग आहेत. त्यावर महापालिकेच्या तिजोरीतील ५ टक्के निधी राखीव ठेवणे आवश्यक आहे. या निधीतून दिव्यांगांना आवश्यक ती मदत देणे गरजेचे आहे. दिव्यांग विभागासाठी स्वतंत्र जागा देणे आवश्यक असताना त्याठिकाणी पुरेसा कर्मचारी आणि दिव्यांगांना बसविण्यासाठी देखील जागा नाही, या सर्व सुविधा देण्याच्या मागणीसाठी संघटनेचे अध्यक्ष राहुल साळवे यांच्या नेतृत्वाखाली ठिय्या आंदोलन करण्यात आले. प्रशासनाच्या आश्वासनानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले.

# इयत्ता दहावी व बारावी पुरवणी परीक्षांसाठी प्रतिबंधात्मक आदेश लागू

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड जिल्हयात लातूर बोर्डाच्यावतीने आजपासून इयत्ता १० वी व १२ वी पुरवणी परीक्षा घेण्यात येत आहेत. इयत्ता १२ वीच्या पुरवणी परीक्षा जिल्ह्यातील १७ केंद्रावर तर इयत्ता १० वीच्या परीक्षा एकूण १४ केंद्रावर सकाळी ११ ते सायं ६ या वेळेत घेण्यात येत आहेत.

भारतीय नागरिक सुरक्षा संहितता २०२३ चे कलम १६३ अन्वये परीक्षा केंद्रापासून ५०० मीटरच्या परिसरात १६ जून ते ८ जुलै २०२६ रोजीपर्यत सकाळी ९ ते रात्री ७ वाजेपर्यत या कालावधीत परीक्षार्थी व परीक्षेच्या कामाशी संबंधीत असलेले अधिकारी व कर्मचारी या व्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीस प्रवेश करता येणार नाही. तसेच, परीक्षेच्या कामाशी संबंधीत असलेले अधिकारी व कर्मचारी या व्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीस कॅलक्युलेटर, ट्रॅन्झीस्टर, रेडिओ, लॅपटॉप इ. तत्सम साहित्य परीक्षा केंद्रात १०० मीटरपर्यत परिसरात वापरण्यास व जवळ बाळगण्यास, तसेच परीक्षा केंद्रात नेण्यास, त्याचप्रमाणे वर दर्शविलेल्या कालावधीत परीक्षा केंद्राच्या परिसरातील ५०० मीटरपर्यत सर्व सार्वजनिक टेलिफोन्स, एसटीडी, भ्रमणध्वनी, फॅक्स, झेरॉक्स, पेजर आणि ध्वनीक्षेपक चालू ठेवण्यास प्रतिबंध करण्यात आला आहेत, असे आदेश पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी निर्गमित केले आहेत.

जे- / /१७१०/२०२६
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नांदेड विभाग,नांदेड
दिनांक - १६/०६/२६

**चौकशीची जाहीर नोटीस**

अर्ज क्रमांक ३५३/२०२६ कलम १९

सार्वजनिक न्यासाचे नांव : जिजाबाई बहुउदेशिय सेवाभावी संस्था,केरुर ता.बिलोली जि.नांदेड

अर्जदार नांव : तरटे भास्कर नागोराव

सर्व संबधित लोकास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मा.सहाय्यक धर्मादाय आयुक्त नांदेड, विभाग नांदेड हे वर नमुद केलेल्या अहवाल अर्ज या संबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

१. वर नमुद केलेला सार्वजनिक न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय?

२. खालील निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीचा आहे काय?

अ) जंगम मिळकत (वर्णन) : अर्जदार यांच्याकडे सभासद फी रुपये ३५००/- जमा आहेत.

ब) सदर मिळकत (वर्णन) :

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देण्याचा असेल त्यांनी त्याची लेखी कैफियत हि नोटीस प्रसिध्द झालेल्या तारखे पासून तीस दिवसाच्या आत या कार्यालयाच्या पत्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे, त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पूर्ण केली जाईल व अर्जाच्या निकाला बाबत योग्य ते आदेश दिले जाईल.

ही नोटीस माझ्या सहीनिशी व मा.सहाय्यक धर्मादाय आयुक्त नांदेड यांचे शिक्यानिशी आज दिनांक १६/०६/२०२६ रोजी दिली.

स्वाक्षरित/-
**(श्रीरामे बि.एन.)**
**वरिष्ठ लिपिक**
सार्वजनिक न्यास नोंदणी
कार्यालय,नांदेड विभाग नांदेड

स्वाक्षरित/-
**(श्री.बि.एस.अवचार)**
**(अधिक्षक)**
सार्वजनिक न्यास नोंदणी
कार्यालय,नांदेड विभाग नांदेड

**टी.सी.हरवली आहे**

माझी निकिता बबन चव्हाण या नावाची इयत्ता १२ वी पासची टी.सी. लोहा ते कंधार बस प्रवासात हरवली आहे. कोणास सापडल्यास खालील पत्यावर संपर्क साधावा.

पत्ता
**निकिता बबन चव्हाण**
रा.गोधनी तांडा ता.लोहा जि.नांदेड

**नगर पंचायत,अर्धापूर**

जा.क्र.१५४८/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.१२/९/२०२५

**जाहीर सुचना**

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **विक्रम गोविंद फटाले व इतर** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **२५६ गट क्र.-- प्लॉट क्र.--** वरील नाव बदल करणे **दि. / /२०२५** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **अक्षय गोपाल फटाले** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :- शपथपत्र/समंतीपत्र, २) बक्षीस पत्र :- ३) वारसा हक्क :- ४) वाटणी पत्र :- ५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या अर्धापूर वार्डातील -- नगर/गल्ली मधील असून त्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- अनुराधा फटाले यांचे दुकान क्र.४, पश्चिमेस :- मुख्य रस्ता, उत्तरेस :- रस्ता, दक्षिणेस :- सुमनबाई दामोदर फटाले यांचा हिस्सा

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
नगर पंचायत,अर्धापूर

# जबरदस्तीने खिशातील सात हजार रुपये काढून घेतले

नांदेड/प्रतिनिधी-जुनामोंढा टावर मैदानाच्या प्रांगणात बसलेल्या नारायण जाधव यांच्या खिशातील सात हजार रुपये सोमवारी दुपारी जबरदस्तीने काढून घेण्यात आले. या प्रकरणी इतवारा पोलीस ठाण्यात रुपेश जगदाळे, करणसिंघ बादल, दत्ता भरकडे व अन्य एका जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**नगर पंचायत,अर्धापूर**

जा.क्र.१५४६/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.१२/९/२०२५

**जाहीर सुचना**

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **जिजाबाई भ्र.सखाराम साबळे** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **१७५५/७३ पैकी गट क्र.६०३ प्लॉट क्र.५५ चा भाग** वरील नाव बदल करणे **दि. / /२०२५** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **दगडूबाई शंकरराव साबळे** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :- ५६५/२०१५ दि.१६.६.२०१५, २) बक्षीस पत्र :- ३) वारसा हक्क :- ४) वाटणी पत्र :- ५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या अर्धापूर वार्डातील -- नगर/गल्ली मधील असून त्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- प्लॉट क्र.५६, पश्चिमेस :- रस्ता, उत्तरेस :- प्लॉट क्र.७१, दक्षिणेस :- रस्ता.

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
नगर पंचायत,अर्धापूर

# जि.प.हायस्कूल मांडवी येथे प्रवेशोत्सव उत्साहात साजरा

मांडवी/प्रतिनिधी-उन्हाळ्याच्या सुट्टीनंतर नवीन शैक्षणिक सत्र २०२६-२७ ला १५ जूनपासून सुरुवात झाली आहे. पहिल्याच दिवशी जिल्हा परिषद हायस्कूल, मांडवी येथे नवोदित विद्यार्थ्यांचा 'प्रवेशोत्सव' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी शाळेत पहिल्यांदाच पाऊल ठेवणाऱ्या चिमुकल्यांचे सरपंच सुमनबाई पेंदोर व गटशिक्षणाधिकारी निळकंठ चेटले यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन उत्साहात स्वागत करण्यात आले.

शिक्षण विभागाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार शाळेच्या पहिल्याच दिवशी हा विशेष सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी नवोदित विद्यार्थ्यांचे स्वागत करून त्यांचे कौतुक करण्यात आले. विद्यार्थ्यांचा उत्साह वाढवण्यासाठी त्यांचे सेल्फी घेण्यात आले, तसेच त्यांना नवीन पुस्तके आणि खाऊचे वाटप करण्यात आले. शाळेच्या या उल्लेखनीय प्रगतीची दखल घेत वरिष्ठ अधिकाऱ्यांनी शाळेला विशेष भेट दिली. यामध्ये उपशिक्षणाधिकारी तथा सध्या परिविक्षाधीन प्रशिक्षणार्थी म्हणून कार्यरत असलेले गटशिक्षणाधिकारी निळकंठ चेटले आणि शिक्षण विस्ताराधिकारी योगेश नखाते यांचा प्रामुख्याने समावेश होता. त्यांनी शाळेच्या विविध उपक्रमांचे कौतुक केले. यावेळी सरपंच सुमनबाई पेंदोर, गाटशिक्षण अधिकारी, निळकंठ चेटले, शिक्षण विस्तार अधीकारी, योगेश नखाते, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष दिलीप राठोड, केंद्रप्रमुख जगदीश कोमरवार, दत्तात्रेय संदुलवार, मुख्याध्यापक व्यंकट इंगळे यांची प्रमुख उपस्थिती होती. मांडवी येथील जिल्हा परिषद हायस्कूलची शैक्षणिक प्रगती, क्रीडा क्षेत्रातील कामगिरी, स्वच्छता आणि एकूणच शिस्तबद्ध वातावरण पाहता परिसरातील पालकांमध्ये मोठा उत्साह दिसून येत आहे. या दर्जेदार शिक्षण पद्धतीमुळेच पालक या शाळेकडे आकर्षित होत असून, शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी तब्बल १५ विद्यार्थ्यांनी शाळेत आपला प्रवेश निश्चित केला आहे.

# जि.प.शाळेसमोरील माती हटवली;नियोजन न करता नालीचे खोदकाम

हदगाव/प्रतिनिधी-हदगाव शहरातील जिल्हा परिषद हायस्कूल, मुलींचे हायस्कूल व केंद्रीय प्राथमिक शाळेसमोरील नाली खोदकाम आणि तेथील माती-मुरूमामुळे विद्यार्थी, पालक व वाहनधारकांना होत असलेल्या त्रासाबाबत सायं दैनिक नांदेड वार्ता मध्ये प्रकाशित झालेल्या नगरसेवक गप्प का? या वृत्ताची अखेर प्रशासनाने दखल घेतली आहे.संबंधित ठिकाणावरील माती हटविण्यात आली असून नालीचे बांधकामही तात्पुरते थांबविण्यात आले. दरम्यान, हे काम कोणतेही ठोस नियोजन व तांत्रिक पाहणी न करता सुरू करण्यात आल्याचे समोर आले आहे.

यासंदर्भात सामाजिक कार्यकर्ते अन्वर खान, अहमद चाऊस, तसेच पालक व नागरिकांनी दि.१५ जून रोजी संबंधित विभागांना निवेदन देऊन गंभीर आक्षेप नोंदविले आहेत. निवेदनात म्हटले आहे की, शाळेसमोरील नालीची उंची निर्धारित मर्यादेपेक्षा जास्त ठेवण्यात येत असल्याने पावसाळ्यात शाळेच्या प्रांगणात तळ्यासारखी परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे परिसरातील अंदाजे दोन हजार विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यानंतर बालवाडीपासून दहावीपर्यंतचे विद्यार्थी या मार्गाने ये-जा करतात. अशा परिस्थितीत नालीचे काम विद्यार्थ्यांच्या जीवितास धोका निर्माण करणारे ठरू शकते, अशी भीती व्यक्त करण्यात आली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपअभियंत्यांनी तात्काळ स्थळाची पाहणी करून काम थांबवावे, तसेच बांधकाम अंदाजपत्रक व नियमांनुसारच करावे, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. भविष्यात या कामामुळे शाळा, विद्यार्थी किंवा नागरिकांना कोणतीही हानी झाल्यास संबंधित विभाग व कंत्राटदार यांना जबाबदार धरण्यात येईल, असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

या संदर्भात हदगाव नगर परिषदेचे मुख्याधिकारी गौरव वांडेकर यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, संबंधित नालीचे काम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सुरू असून अद्याप नालीचा आउटलेटच काढण्यात आलेला नाही. ही बाब संबंधित विभागाच्या निदर्शनास आणून दिली जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. हदगाव शहर व तालुक्यात विविध विकासकामे सुरू असली तरी ती कोणत्या योजनेअंतर्गत, कोणत्या विभागामार्फत आणि कोणत्या कंत्राटदाराकडून केली जात आहेत, याची माहिती नागरिकांना उपलब्ध होत नसल्याची खंत व्यक्त होत आहे. वारंवार मागणी करूनही माहिती दिली जात नसल्याने पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, नेमके काय लपविले जात आहे? असा सवाल नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे. जि.प. शाळेसमोरील धोकादायक परिस्थितीवर वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतरच हालचाली सुरू झाल्याने शहरात या प्रश्नाची चर्चा रंगू लागली आहे. नागरिकांनी मात्र विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

# केंद्राकडून सेल ब्रॉडकास्ट अलर्ट सेवा स्थगित

## मध्यरात्री पंतप्रधान मोदींचा मोबाईल खणखणला

नवी दिल्ली:देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा मोबाईलवर मध्यरात्री अचानक अलर्ट रिंग टोन खणखणला. याची गंभीर दखल घेत केंद्र सरकारने सेल ब्रॉडकास्ट अलर्ट सेवा तात्काळ स्थगित करण्याचे आदेश दिले आहेत.

देशभरातील कोट्यवधी मोबाईलधारकांना गेल्या काही दिवसांपासून अचानक मोठ्या आवाजासह इमर्जन्सी संदेश प्राप्त होत होते. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने सेल ब्रॉडकास्ट अलर्ट सिस्टिमची सेवा पुढील आदेशापर्यंत तात्पुरती स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे. १२ जून पर्यंत या यंत्रणेची यशस्वी चाचणी पूर्ण झाल्यानंतर ही सेवा थांबवण्यात आली असल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, मध्यरात्रीच्या सुमारास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मोबाईलवरही आपत्कालीन अलर्ट पोहोचल्याची घटना घडली. विशेष म्हणजे, फोन सायलेंट मोडमध्ये अथवा बंद अवस्थेत असतानाही मोठ्या आवाजात सायरन वाजल्याने प्रशासनात खळबळ उडाली. या अनपेक्षित प्रकारानंतर राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने (एनडीएमए) तातडीने हस्तक्षेप करत ही सेवा पुढील आदेशापर्यंत स्थगित करण्याचे निर्देश दिल्याचे वृत्त द हिंदूने दिले आहे.सेल ब्रॉडकास्ट अलर्ट सिस्टिम ही अत्याधुनिक मोबाईल आधारित सूचना प्रणाली असून, ती पारंपरिक एसएमएस सेवांपेक्षा वेगळी आहे. या माध्यमातून कोणत्याही मोबाईल क्रमांकाची आवश्यकता न भासता एका विशिष्ट परिसरातील किंवा मोबाईल टॉवरच्या कार्यक्षेत्रातील लाखो-कोट्यवधी नागरिकांना एकाच वेळी इशारा संदेश पाठवता येतो.

# सिंदखेड पोलिसांच्या प्रसंगावधानामुळे शेतकऱ्याला जीवनदान

माहूर/प्रतिनिधी-सिंदखेड पोलिसांच्या प्रसंगावधान, धाडस आणि कर्तव्यनिष्ठेमुळे करंट लागून विद्युत तारेस चिकटलेल्या एका शेतकऱ्याचे प्राण वाचल्याची घटना आज सकाळी घडली.पोलिसांनी दाखविलेल्या समय सूचकतेमुळे मोठा अनर्थ टळला असून परिसरात त्यांच्या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पोलिस स्टेशन सिंदखेड येथील सहाय्यक पोलिस निरीक्षक संतोष जोंधळे, सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक राठोड आणि पोलिस कॉन्स्टेबल संदीप वानखेडे हे सकाळी सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास नियमित पेट्रोलिंगसाठी वाई बाजारच्या दिशेने जात होते. यावेळी मौजे मनिरामथड येथील शेतशिवारात एका व्यक्तीला शेतातील पाण्याच्या मोटारीच्या विद्युत तारेचा करंट लागून तो तारेला चिकटल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी तात्काळ सरकारी वाहन थांबविले. स्वतःच्या जीवाची पर्वा न करता जवळील झाडाच्या लाकडाचा वापर करून त्यांनी संबंधित व्यक्तीला विद्युत प्रवाहापासून सुरक्षितपणे दूर केले. पोलिसांच्या या धाडसी व प्रसंगावधानपूर्ण कृतीमुळे एका शेतकऱ्याचे प्राण वाचले.जखमी शेतकऱ्याचे नाव दीपक पेटकुळे (रा. करंजी) असे असून त्यांना तातडीने प्राथमिक आरोग्य केंद्र, सिंदखेड येथे दाखल करण्यात आले. सध्या त्यांची प्रकृती स्थिर असून त्यांच्यावर पुढील उपचार सुरू आहेत.या घटनेमुळे पोलिस दलाविषयी नागरिकांचा विश्वास अधिक दृढ झाला असून, कर्तव्य बजावताना दाखविलेल्या संवेदनशीलता आणि मानवतेबद्दल सिंदखेड पोलिसांवर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# बोगस शाळा व अनधिकृत क्लासेसवर प्रशासनाचा 'हंटर'!

देगलूर/प्रतिनिधी-देगलूर तालुक्यात शासनाच्या मान्यते शिवा शाळा चालविणाऱ्या संस्था,कोचिंग क्लासेसच्या नावाखाली शिक्षण देणारे संचालक आणि नियमाचे उल्लंघन करणाऱ्या व्यवस्थापनाची आता खैर नाही. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ तसेच महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार अशा संस्थांवर दंडात्मक कारवाईचे थेट फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येणार असल्याचा फोटो विचारा गटशिक्षणाधिकारी कार्यालय पंचायत समिती देगलूर यांनी दिला आहे.

राज्यातील अनधिकृत शाळा बंद करण्याबाबत शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने देगलूर तालुक्यातही विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. सीबीएसई, आयसीएसई, आयबी किंवा अन्य मंडळाची सलग्न असल्याचा दावा करणाऱ्या, मात्र शासनाचे ना हरकत प्रमाणपत्र अथवा आवश्यक की परवानगी नसलेल्या संस्थावर कायदेशीर कारवाई होणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये कोचिंग क्लासेसच्या नावाखाली शाळेच्या वेळेत शिक्षण देणाऱ्या अनेक अनाधिकृत इंग्रजी शाळांची माहिती समोर आली होती. त्यावेळी शिक्षण विभागाने संबंधित संस्थांना नोटिसा बजावून त्या बंद करण्याची कारवाई केली होती. मात्र काही ठिकाणी पुन्हा अशा प्रकारचे प्रयत्न होत असल्याची माहिती मिळाल्याने यंदा प्रशासन अधिक आक्रमक झाले आहे. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये कोणतीही संस्था शाळेच्या वेळेत कोचिंग क्लासेस च्या नावाखाली वर्ग चालवत असल्याचे आढळल्यास सभा घेता विरोधात थेट फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येणार असल्याचे शिक्षण विभाग स्पष्ट केले आहे. देगलूर तालुक्यात अनेक ठिकाणी नर्सरी, एलकेजी आणि युकेजी वर्ग सुरू करण्यात येत आहेत. मात्र शासनाची आवश्यक्य मान्यता न घेता हे वर्ग चालविणे नियमबाह्य असल्याचे शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे.त्यामुळे पालकांनी आपल्या मुलांचा प्रवेश घेताना संबंधित शाळेची शासन मान्यता तपासूनच निर्णय घ्यावा, अन्यथा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्यावर गंभीर परिणाम होऊ शकतो. असा इशारा देण्यात आला आहे. देगलूर तालुक्यात आणि ठिकाणी नर्सरी, एलकेजी आणि यूकेजी वर्ग सुरू करण्यात येत आहेत. मात्र शासनाची आवश्यक्य मान्यता न घेता हे वर्ग चालविणे नियम भाई असल्याचे शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे. अशा संस्थांनी तातडीने आवश्यक की परवानगी मिळवाव्यात, अन्यथा त्यांच्यावर ही कायदेशीर कारवाई होणार आहे. देगलूर तालुक्यातील जिल्हा परिषद आणि अनुदानित शाळांमध्ये सुरू असलेल्या सेमी इंग्रजी वर्गाबाबत ही प्रशासनाने स्पष्ट निर्देश दिले आहेत शासनाने मंजूर केलेल्या तुकड्यापेक्षा अधिक वर्ग स्वरूप ठेवणे बेकादेशीर ठरणार असून अतिरिक्त तुकड्या तात्काळ बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. शासनमान्य क्षमतेनुसारच विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात यावा, असेही सांगण्यात आले आहे.

# इयत्ता पहिलीच्या चिमुकल्यांचे बैलगाडीतून शाळेत आगमन



माहूर/प्रतिनिधी-नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी सोमवारी माहूर तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पवनाळा (वरचा) येथे प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात आणि पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला. यावेळी इयत्ता पहिलीच्या चिमुकल्यांचे स्वागत अनोख्या पद्धतीने करण्यात आले. विद्यार्थ्यांची सजवलेल्या बैलगाडीतून गावातून मिरवणूक काढण्यात आली, त्यामुळे संपूर्ण गावात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

गावातील प्रमुख मार्गांवरून काढण्यात आलेल्या या मिरवणुकीत नागरिकांनी विद्यार्थ्यांवर पुष्पवृष्टी करत त्यांचे स्वागत केले. शाळेच्या परिसरात विद्यार्थ्यांचे औक्षण करून पुष्पहार घालण्यात आले. नवीन विद्यार्थ्यांना शाळेची गोड ओळख करून देत त्यांच्यात शिक्षणाविषयी आकर्षण निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. यावेळी शाळा पूर्वतयारी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षासाठी पाठ्यपुस्तकांचे वाटप, मोफत गणवेश वितरण आणि शालेय पोषण आहारांतर्गत मिष्ठान्न भोजन देण्यात आले. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहताना दिसत होता.कार्यक्रमाला शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रमेश आडे, उपाध्यक्ष लक्ष्मण चोले, शिक्षणतज्ज्ञ सदस्य गोविंद केंद्रे, ग्रामपंचायत उपसरपंच दिगंबर केंद्रे, मुख्याध्यापक नरवटे सर, माजी सरपंच आत्माराम जाधव, ग्रामपंचायत कर्मचारी जयसिंग राठोड, अंगणवाडी सेविका सौ. भगत तसेच पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामीण संस्कृतीचा वारसा जपत आणि शिक्षणाची गोडी वाढवत साजरा झालेला हा प्रवेशोत्सव गावकऱ्यांसाठीही विशेष आकर्षण ठरला.

# भोकर बसस्थानकासमोर २०० मीटर नो पार्किंग झोनची अंमलबजावणी

## अवैध वाहतूक करणाऱ्या वाहनावर कारवाई

भोकर/प्रतिनिधी-जिल्हा पोलीस प्रमुखांच्या आदेशानुसार बसस्थानका समोर २०० मीटरच्या आत नो पार्किंग झोन मध्ये अवैध वाहतूक करणाऱ्या वाहनावर कारवाई करण्याची मोहीम भोकर बसस्थानका समोर सुरू करण्यात आली अवैध वाहतूक करणाऱ्या वाहनावर कारवाई करण्यात आली.

१४ जून रोजी नांदेड विभागाचे सुरक्षा व दक्षता अधिकारी मुळे,सहाय्यक सुरक्षा निरीक्षक कदम, वाहतूक अधीक्षक साखरे, वाहतूक कर्मचारी व पोलीस कर्मचारी यांच्या मदतीने २०० मीटरच्या आत नो पार्किंग झोन मध्ये अवैध वाहतूक करणाऱ्या वाहनाविरुद्ध कारवाई करून अंमलबजावणी करण्यात आली. वाहनांना बाहेर काढण्यात आले अवैध वाहतूक करणाऱ्या वाहना विरुद्ध नेहमी अशाच प्रकारे मोहिम चालू ठेवण्यात यावी अवैद्य वाहनांना पायबंद करावा शहरातील आंबेडकर चौकात मोठ्या प्रमाणावर अवैध वाहतुकीची वाहने उभी राहतात त्यांच्यावर देखील कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी जनतेतून होत आहे.




कोळी महादेव, मल्हारी कोळी, टोकरे कोळी, ढोर कोळी, डोंगर कोळी या आदीवासी कोळी जमातीतील बांधवांना जातीचे दाखले व जात वैधता प्रमाणपत्र सुलभरित्या मिळावी या मागणीसाठी कोळी महासंघाच्यावतीने एकदिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी एका शिष्टमंडळाने निवासी उपजिल्हाधिकारी किरण आंबेकर यांना निवेदन दिले. यावेळी शंकर मनाळकर, शिवाजीराव गलांडे, राम मालेवाड, के.एन.जेठेवाड, पुंडलिक बोंडलेवाड यांच्यासह इतर उपस्थित होते.

पान १ वरुन

### पावसाचे ५ जुलैनंतरच...

सक्रिय होण्याची चिन्हे आहेत. मात्र देशभरात मान्सून पूर्णपणे पोहोचण्यासाठी जुलैचा पहिला किंवा दुसरा आठवडा उजाडण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.मुंबई, ठाणे आणि पालघर जिल्ह्यांत तुरळक हलक्या सरींची शक्यता असून, रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि गोवा परिसरात मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अंदाज आहे. तर नागपूर, गोंदिया, वर्धा, यवतमाळ, चंद्रपूर आणि गडचिरोली या विदर्भातील जिल्ह्यांमध्ये मेघगर्जनेसह पाऊस पडू शकतो. मात्र मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात पावसाची शक्यता अत्यल्प असल्याने हे भाग सध्या कोरडेच राहण्याची शक्यता आहे.

### जात वैधता प्रमाणपत्रासाठी...

महाराष्ट्र ग्रामीण पेयजल धोरण-२०२६ जाहीर करण्यात आले. विविध योजनांचे एकत्रीकरण करून स्वच्छ, निर्जंतुक व दर्जेदार पाणीपुरवठा सुनिश्चित करण्यासाठी दीर्घकालीन नियोजन करण्यात येणार असून ग्रामीण पेयजल योजनांच्या शाश्वत विकासावर भर देण्यात येणार आहे.


## जाहीर प्रगटन

नांदेड येथील पाचवे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ट स्तर नांदेड
यांच्या न्यायालयात
(समक्ष श्रीमती कांचन बाबासाहेब सोनवणे)
किरकोळ दिवाणी अर्ज (आर.जे.ई.) क्र.५६२/२०२६
पुढील तारीख : / /२०२६
कमलबाई भीमराव ढगे विरुद्ध निरंक

अर्जदार : १) कमलबाई भ्र.भीमराव ढगे वय : ७२ वर्ष धंदा : घरकाम, २) प्रमोद पि.भीमराव ढगे वय : ५३ वर्षे, धंदा : खाजगी नोकरी, ३) रामचंद्र पि.भीमराव ढगे वय : ५१ वर्षे, धंदा : नोकरी, ४) शितल पि.भीमराव ढगे वय : ४९ वर्षे, धंदा : नोकरी, ५) संतोष पि.भीमराव ढगे वय : ४८ वर्षे, धंदा : नोकरी

विरुद्ध

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : वारसा प्रमाणपत्र मिळण्याचा अर्ज.

ज्याआर्थी अर्जदाराने न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. मयत नामे भीमराव पि.रामचंद्र ढगे यांचा मृत्यू दिनांक २३/०६/२०२१ रोजी कमलनयन बजाज हॉस्पीटल, सातरा परिसर, औरंगाबाद ता.जि.औरंगाबाद येथे झाला आहे. अर्जदार क्र.१ ही मयताची पत्नी असून अर्जदार क्र.२, ३, ५ हे मुले असून अर्जदार क्र.४ ही मुलगी आहे. वर नमुद अर्जदारा शिवाय ईतर कोणतेही मयताचे कायदेशीर वारस नसल्याचे अर्जदाराने अर्जात कथन केले आहे. अर्जदारानी मा.न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. तरी प्रस्तुत प्रकरण अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ते स्वतः हाजर राहुन या न्यायालयात दिनांक : १७/०७/२०२६ रोजी किंवा त्यापुर्वी उजर नोंदवावा. मुदतीनंतर येणाऱ्या उजर आक्षेपास विचार करण्यात येणार नाही. व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल. आज दिनांक : १६/०६/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

आदेशावरुन

स्वाक्षरित/- **कनिष्ठ लिपीक** दि.न्या.व.स्तर,नांदेड

स्वाक्षरित/- **सहायक अधिक्षक** दि.न्या.व.स्तर,नांदेड


# हातभट्टी दारुचा अड्डा शिवसैनिकांनीच केला उध्वस्त

भोकर/प्रतिनिधी-तालुक्यातील ग्रामीण भागात आजही मोठ्या प्रमाणावर हातभट्टीची दारू काढली जाते या प्रकाराबाबत डोरली येथे चालू असलेला हातभट्टी दारूचा अड्डा १४ जून रोजी शिवसैनिकांनीच उध्वस्त केला.

भोकर तालुक्यात अवैधरीत्या देशी दारूची विक्री मोठ्या प्रमाणावर केली जाते तसेच हातभट्टी दारू सुद्धा ग्रामीण भागात काढली जाते तालुक्यातील मौजे डोरली साळवाडी येथे देशी दारूची अवैधरीत्या विक्री करण्यात येत असल्याबाबत पोलिसांना निवेदन देण्यात आले होते. त्यानंतर १४ जून रोजी शिवसेनेच्या वतीने ॲड.शेखर कुंटे यांच्या नेतृत्वाखाली डोरली येथील युवा सेनेचे उपतालुका प्रमुख नागेश पाटील इंगळे यांच्यासह संतोष वाकोडे, ज्ञानेश्वर खरोडे, रामप्रसाद खूपसे, पिराजी खूपसे, लकी खरोडे यांनी डोरली शिवारात चालू असलेला अवैध दारू हातभट्टी कारखाना उध्वस्त केला त्या ठिकाणी असलेले सर्व साहित्य फेकून दिले. या कामगिरीबद्दल आ.हेमंत पाटील, जिल्हाध्यक्ष विनय पाटील गिरडे युवा सेना जिल्हाध्यक्ष विकास देशमुख यांनी सर्वांचे कौतुक केले आहे.

पान १ वरुन

### मारहाण करुन लुटणाऱ्या...

दुचाकी व पाच मोबाईल जप्त केले. दुचाकी व मोबाईल संदर्भात पोलीसांनी आरोपीकडे कसून चौकशी केली असता त्यांनी दीड ते दोन महिन्यांपूर्वी बिलोली ते नरसी रोड, नरसी ते हैद्राबाद रोड, नरसी ते नांदेड रोडवर तसेच मारतळा गावाजवळ दुचाकी चालकांना मारहाण करुन लुटल्याची कबुली त्यांनी दिली. तीन्ही आरोपींना पुढील तपासासाठी रामतिर्थ पोलीस स्टेशनच्या सुपूर्द करण्यात आले.

### सहलीला गेलेले नगरसेवक...

केले आहे. महाविकास आघाडीचे अनेक नगरसेवक भाजप उमेदवाराच्या गळाला लागले आहेत. काही अदृश्य ताकद ही भाजपच्या पाठीमागे उभी राहिल्याने अमर राजूरकर हे साडेतीनशे पेक्षा जास्त मते घेवून विजयी होतील, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. आठ ते दहा दिवस मौजमजा व सहलीचा आनंद घेवून नगरसेवक परतीच्या वाटेवर निघाले आहेत. बुधवारी सकाळी जिल्ह्याच्या सिमेवर सहलीला गेलेले सर्व नगरसेवक एकत्र येतील. नगरसेवकांना वरिष्ठ नेते मार्गदर्शन केल्यानंतर गुरुवार दि.१८ जून रोजी वाहनाद्वारे या नगरसेवकांना मतदानासाठी मतदान केंद्रा पर्यंत पोहचविले जाणार आहेत.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग अॅण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४